# शैक्षणिक सहल नियोजन – ISRO

१. शैक्षणिक **अभ्यासदौऱ्या**साठी निवडलेले विद्यार्थी, शिक्षक,अधिकारी/कर्मचारी यांचा **अभ्यासदौऱ्या**च्या कालावधीसाठी अपघात विमा उतरविणे. (विमान प्रवासासह)

**२.** दिनांक १६.०१.२०२३ रोजी जिल्हा परिषद,रत्नागिरी प्रांगणात विद्यार्थी जमल्यानंतर त्यांच्या नाष्ट्याची व्यवस्था करणेत येणार आहे. .(सकाळचा नाष्टा ०८.०० ते ०९.००,चहा/ कॉफी/ बॉर्नव्हिटा/दुध/नाष्टा पोहे,इडली व तत्सम ११.१५ ते ११.३०, दुपारचे जेवण ०१.०० ते ०२.००(शाकाहारी व मांसाहारी), चहा/कॉफी/बॉर्नव्हिटा/दुध/फुड पॅकेट दुपारी २.०० ते ४.३०, रात्रीचे जेवण ०८.०० ते ०९.०० (शाकाहारी व मांसाहारी), या वेळापत्रकात परिस्थितीनुसार बदल होऊ शकतो. प्रवासादरम्यान विमान उड्डाणास उशिर होणे, काही कारणास्तव प्रवासास अडथळा निर्माण होणे अशा कारणांमुळे अडचणी उद्भवल्यास आवश्यकतेनुसार चहा नाष्टा व जेवणाची सुविधा करण्यात येणार आहे.

३. विमान प्रवासासाठी तिकीट आरक्षण करणे. (जाताना- पणजी ते बेंगलोर,बेंगलोर ते त्रिवेंद्रम व परत त्रिवेंद्रम ते पणजी ) तिकीट आरक्षण झाल्यानंतर आरक्षणाचा दिनांक वेळ (परतीसह) कार्यालयास अवगत करणे. त्यानुसार जाण्या-येण्याचे वेळापत्रक तयार केले जाणार आहे.

४. जिल्हा परिषद,रत्नागिरी प्रांगण ते पणजी विमानतळ ते बेंगलोर व हॉटेल मुक्काम, बेंगलोर विमानतळ ते त्रिवेंद्रम विमानतळ राहण्याचे ठिकाण (त्रिवेंद्रम), त्रिवेंद्रम ते थुंबा (स्पेस स्टेशन), परतीचा प्रवास थुंबा ते त्रिवेंद्रम ते पणजी ते रत्नागिरी जिल्हा परिषद अशा परतीच्या प्रवासासाठी ३५ आसन क्षमता (वातानुकुलीत यंत्रणेसह) असलेल्या वाहनाची व्यवस्था करणे. त्यामध्ये प्राथमिक उपचार, अग्नीशमन यंत्रणा यासारख्या प्राथमिक अत्यावश्यक सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे.

५. **अभ्यासदौऱ्या**साठी आवश्यक असलेल्या परवानग्या ( विमानप्रवास, स्पेस स्टेशन, म्युझीयम या ठिकाणांना भेट देण्यासाठी आवश्यक असणा-या परवानग्या, नाव नोंदणी इ. प्राप्त करुन घेणे व गरजेनुसार शुल्क भरणे.टोल व पार्किंग चार्जेस इ.)

६. दौऱ्याचा प्रवास,जेवण व मुक्कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र | दिनांक | तपशिल | मुक्कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| २ | १६.०१.२०२३ | सकाळी जिल्हा परिषद रत्नागिरी येथून पणजी विमानतळकडे प्रयाण,<br>पणजी विमानतळ ते बेंगलोर विमान प्रवास | संध्याकाळी बेंगलोर येथे थ्री स्टार हॉटेलमध्ये मुक्काम |
| ३ | १७.०१.२०२३ | सकाळी बेंगलोर येथे विश्वेश्वरैय्या म्युझियम पहाणे.<br>बेंगलोर ते त्रिवेंद्रम विमान प्रवास | संध्याकाळी त्रिवेंद्रम येथे थ्री स्टार हॉटेलमध्ये मुक्काम |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १८.०१.२०२३ | सकाळी विक्रम साराभाई स्पेस सेंटर इस्त्रो येथे भेट,रॉकेट लाँच पहाणे,स्पेस म्युझियम भेट. | संध्याकाळी त्रिवेंद्रम येथे थ्री स्टार हॉटेलमध्ये मुक्काम |
| ५ | १९.०१.२०२३ | त्रिवेंद्रम ते केरळ ,केरळ ते पणजी विमान प्रवास व पणजी ते जिल्हा परिषद रत्नागिरी ( परतीचा प्रवास) | चहा नाष्टा व जेवण प्रवासामध्ये |

७. दौ-याच्या कालावधीत मुक्कामाच्या ठिकाणी थ्री स्टार हॉटेलमध्ये राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे, प्रवासा दरम्यान विद्यार्थ्यांसाठी फुड पॅकेट उपलब्ध करुन देणेत येईल. (शाकाहारी व मांसाहारी मागणीनुसार) भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था, प्रवास, नाष्टा चहापाणी, गाडी पार्कींग इत्यादीची व्यवस्था केलेली आहे.(अभ्यासदौऱ्या ठिकाणीदि.१६.०१.२०२३/ १७.०१.२०२३/१८.०१.२०२३, दि.१९.०१.२०२३ )

८. मुक्कामा दरम्यान विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र रुम्स (खोली) (प्रत्यक्षात हॉटेलच्या उपलब्धतुनसार) सर्व अत्यावश्यक साधनांसह व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र रुम्स (खोली) उपलब्ध केलेल्या आहेत. विद्यार्थीसमवेत त्यांच्या कक्षात पुरूष शिक्षक/कर्मचारी व विद्यार्थीनींच्या कक्षात महिला शिक्षक/कर्मचारी मुक्कामी असणार आहेत.

९. विद्यार्थ्यांना टिपणी लेखन करण्यासाठी लिहिण्यासाठी वही (नोटपॅड), पेन, पेन्सील इ. स्टेशनरी स्वतंत्र पाऊचमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

१०. विमान प्रवासाकरिता Full service airline ला प्राधान्य असेल व याबाबत अंतिम निर्णय मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांचा राहील. Full service airline उपलब्ध न झाल्यास विमानतळावर अथवा विमानामध्ये चहा नाष्टा व जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

११. प्रवास/मुक्कामासाठी ट्रॅव्हल कीट उपलब्ध करुन देणे. (ट्रॅव्हल किटमध्ये टुथपेस्ट, टूथब्रश, कंगवा, शॅम्पू, साबण, हेअर ऑईल, पावडर, ट्रॅव्हल बॅग, जिल्हा परिषद लोगो असणारे जॅकेट इत्यादी दैनंदिन गरजेच्या वस्तुंचा समावेश असावा.)